# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

ज्ञानगंगा घरोघरी

## व्यवस्थापन मंडळ बैठक

## कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| बैठक क्रमांक | : | 174 |
| स्थळ | : | **Online Meeting App** |
| वार व दिनांक | : | **शनिवार दि. 31 ऑक्टोबर 2020** |
| वेळ | : | सकाळी 11:30 वाजता |

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

## (महाराष्ट्र शासनाने वर्ष 1989 मध्ये स्थापिलेले)

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळाची 174 वी ऑनलाईन बैठक शनिवार दि. 31 ऑक्टोबर, 2020 रोजी सकाळी 11.30 वा. आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

1. मा.प्रा. ई. वायुनंदन, कुलगुरू — अध्यक्ष
2. मा. डॉ. दिलीप म्हैसेकर, कुलगुरू, नाशिक — सदस्य
3. मा.डॉ. आशिष पातुरकर, कुलगुरू, नागपूर — सदस्य
4. डॉ. सत्यकामा, प्र कुलगुरू, इंगांरामुवि, नवी दिल्ली — सदस्य
5. मा.डॉ. अनिल कुलकर्णी, पुणे — सदस्य
6. मा.श्री. ज्ञानदेव नाठे, संचालक, तंत्रशिक्षण यांचे प्रतिनिधी — सदस्य
7. मा, श्री. हेमंत आंबासेलकर, नागपूर — सदस्य
8. मा, डॉ. सचिन मांडवगणे, नागपूर — सदस्य
9. मा. श्री.मगन पाटील ,प्रभारी कुलसचिव — सचिव

खालील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.

10.प्रा. महेंद्र लामा, नवी दिल्ली — सदस्य
11. मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण, मुंबई — सदस्य
12. मा. सचिव, उद्योग, मुंबई — सदस्य
13. मा. सचिव, कृषी, मुंबई — सदस्य
14. मा, संचालक, उच्च शिक्षण, पुणे — सदस्य
15. मा, संचालक, व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण — सदस्य
16. मा.श्री. विलास शिंदे, नाशिक — सदस्य

| क्र. | ठराव क्र. | तपशिल |
|---|---|---|
| 174.1.0 | | **स्वागत – Welcome by Registrar** |
| | 174.1.1 | बैठकीच्या सुरुवातीला कुलसचिवांनी उपस्थित सदस्यांचे स्वागत केले. मा. कुलगुरू यांनी इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाचे कुलगुरु यांनी नामनिर्देशित केलेले डॉ. सत्यकामा, प्र-कुलगुरु, इंदीरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, नवी दिल्ली यांचा परिचय करून दिला व त्यांचे स्वागत केले.<br><br>मा. कुलगुरू यांनी बैठकीच्या सुरुवातीला विद्यापीठाने आयोजीत केलेल्या परिक्षेबाबत उपस्थित सदस्यांना माहिती दिली. कोविड 19 प्रादुर्भाव बघता मा.राज्यपाल व महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांनी निर्देशीत केल्यानुसार विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑनलाईन एम.सी.क्यु.पध्दतीने दि.५ ऑक्टोबर २०२० ते दि.३१ ऑक्टोबर २०२० या कालावधीत आयोजित करण्यात आल्या होत्या. यासाठी अंतिम |

| | | |
|---|---|---|
| | | वर्षाच्या १६१ शिक्षणक्रमाच्या एकूण 1,91,191 विद्यार्थ्याची परीक्षेचे आयोजन विद्यापीठाने केले होते दररोज 60,000 पर्यंत विद्यार्थी परीक्षा देत होते. एकूण 10 लाखापर्यंत उत्तरपुस्तिका विद्यापीठाला घ्यायच्या आहेत. यापैकी 8 लाखापर्यंत विद्यार्थ्यांनी कोणतीही अडचण न येता विद्यार्थी परिक्षेस बसले होते. एकूण ८०% विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने परीक्षा दिलेली आहे. ऑनलाईन परीक्षेमध्ये कोणतीही अडचण आलेली नाही. तसेच जे विद्यार्थी परीक्षेस बसू शकले नाहीत त्यांच्यासाठी दि. ४ नोव्हेंबर ते ९ नोव्हेंबर २०२० रोजी पुन्हा ऑनलाईन परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे.<br><br>***व्यवस्थापन मंडळ ठराव*** - *व्यवस्थापन मंडळ सदस्य* डॉ. अनिल कुलकर्णी यांनी मंडळाच्या वतीने अभिनंदनाचा प्रस्ताव ठेवला. यासाठी मा. कुलगुरू, कुलसचिव तसेच परिक्षा नियंत्रक व परिक्षा विभागातील सर्व अधिकारी व कमर्चारी तसेच शिक्षकांचे अभिनंदन व गौरवाचा ठराव पारीत करण्यात आला. तसेच विद्यापीठाने व वित्त विभागाने आयकर परताव्यासाठी केलेल्या कार्यवाहीबाबत डॉ. सचिन मांडवगणे यांनी अभिनंदन केले.<br><br>व्यवस्थापन मंडळ सदस्य डॉ. अनिल कुलकर्णी यांनी Financial Awareness Course हा सहा महिन्याचा प्रमाणपत्र शिक्षणक्रम विद्यापीठाने सुरु करावा असे सुचविले. |
| | 174.2.1 | दि 29ऑक्टोबर 2020 रोजी झालेल्या वित्त समितीचे विषय मंजुरीस्तव सादर |
| | | **माहितीस्तव सादर करावयाचे विषय** |
| | 174.2.2 | सन 2016-17, 2018-19, 2019-20 या तीन आर्थिक वर्षामध्ये विद्यापीठाला आयकर खात्याने नोटीसा दिल्या होत्या ह्याबाबत विद्यापीठाने योग्य पध्दतीने, विहीत कार्यवाही करुन, आयकर परतावा विद्यापीठास मिळवलेला आहे.<br><br>***वित्त समिती ठराव क्र. 15.3.1***– सन 2016-17, 2018-19, 2019-20 या तीन आर्थिक वर्षामध्ये विद्यापीठाने व वित्त विभागाने आयकर परताव्यासाठी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेऊन मा. कुलगुरु, मा.कुलसचिव, तसेच वित्त विभागातील, आस्थापना कक्षातील व बांधकाम कक्षातील अधिकारी व कर्मचारी यांचे वित्त समिती सदस्यांनी अभिनंदन केले व इतरही वर्षाच्या बाबतीत अशाच प्रकारे कार्यवाही करण्यात यावी असे निर्देशित केले तसेच या यशाबद्दल वित्त विभागातील अधिकारी व कर्मचा-यांना तसेच संबंधितांना मा.कुलगुरु यांनी प्रशस्तीपत्रक द्यावे असे ठरले सदर बाबीची व्यवस्थापन मंडळास शिफारस करण्यात यावी असे ठरले.<br><br>***व्यवस्थापन मंडळ ठराव***- वित्त समितीच्या ठरावानुसार वरीलप्रमाणे आर्थिक वर्षामध्ये विद्यापीठाने व वित्त विभागाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली. |
| | 174.2.3 | विद्यापीठाच्या प्रशासकीय कार्यपध्दतीत यांत्रिकीकरणाचा अवलंब करुन , टेंडर प्रक्रिया राबवुन तसेच विद्यापीठाच्या प्रशासकीय कार्यपध्दतीत पारदर्शकता व अचुकता आणुन |

| | | |
|---|---|---|
| | | परीक्षेच्या खर्चात बचत करुन विद्यापीठाच्या एकूण खर्चात मोठ्या प्रमाणात बचत केलेली आहे.<br><br>***वित्त समिती ठराव क्र. 15.3.2*** — विद्यापीठाने तांत्रिक बाबी व प्रशासकीय बाबींमध्ये सुधारणाकरुन केलेल्या बचतीची नोंद घेऊन विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन केले. सदर बाबीची व्यवस्थापन मंडळास शिफारस करण्यात यावी असे ठरले<br><br>***व्यवस्थापन मंडळ ठराव***- वित्त समितीच्या ठरावानुसार केलेली शिफारस मान्य करण्यात आली. |
| 174.3.0 | | **सखोल चर्चेचे विषय** |
| | 174.3.1 | सन 2019-2020 आर्थिक वर्षात विद्यापीठातील कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान देणेबाबत.<br>***वित्त समिती ठराव क्र. 15.3.3*** — दरवर्षीप्रमाणे सन 2019-2020 वित्तीय वर्षासाठी सानुग्रह अनुदान मंजुर करतांना देशातील व राज्यातील कोविड 19 या परिस्थितीचा सहानुभुतीपुर्वक विचार करुन खालीलप्रमाणे सानुग्रह अनुदान अदा करणेस मंजुरीसाठी शिफारस करण्यात यावी असे ठरले<br>1) नियमित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना रु. 35,000/-मात्र<br>2) करारावरील कर्मचा-यांना रु. 25,000/-किंवा ते प्रत्यक्ष घेत असलेल्या दरमहा एकत्रित मासिक वेतन यापैकी जी कमी असेल ती रक्कम<br>3) सफाई/सुरक्षा व दैनंदिन वेतनावरील कंत्राटदाराकडील कर्मचारी रु. 7, 000/- मान्यता देण्यात आली.<br>उपरोक्त सानुग्रह अनुदान देतांना 30 सप्टेंबर 2020 पर्यंत ज्या कर्मचा-यांना सहा महिने पूर्ण झालेले असतील त्यांना देय राहिल<br><br>***व्यवस्थापन मंडळ ठराव***- *वित्त समितीने केलेल्या ठरावानुसार खालीलप्रमाणे सन* 2019-2020 आर्थिक वर्षासाठी<br>1) नियमित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना रु. 35,000/-मात्र<br>2) करारावरील कर्मचा-यांना रु. 25,000/- किंवा ते प्रत्यक्ष घेत असलेल्या दरमहा एकत्रित मासिक वेतन यापैकी जी कमी असेल ती रक्कम<br>3) सफाई/सुरक्षा व दैनंदिन वेतनावरील कंत्राटदाराकडील कर्मचारी रु. 7, 000/- मान्यता देण्यात आली.<br>उपरोक्त सानुग्रह अनुदान देतांना 30 सप्टेंबर 2020 पर्यंत ज्या कर्मचा-यांना सहा महिने पूर्ण झालेले असतील त्यांना देय राहिल<br>अशी शिफारस मान्य करण्यात आली. |
| | 174.3.2 | विद्यापीठात नोव्हेंबर 2005 नंतर नियमित वेतनश्रेणीत नियुक्ती केलेल्या शिक्षक,शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी यांना नॅशनल पेन्शन स्कीम (NPS) योजना लागु करण्याची बाब.<br>***वित्त समिती ठराव क्र.*** 15.3.4— विद्यापीठात नोव्हेंबर 2005 नंतर नियमित वेतनश्रेणीत नियुक्ती केलेल्या शिक्षक,शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी |

| | | |
|---|---|---|
| | | नॅशनल पेन्शन स्कीम (NPS) ही योजना HDFC Pension Co. Ltd.यांच्यामार्फत राबविण्यास मंजुरी देण्यात आली व सदर बाबीची व्यवस्थापन मंडळाकडे शिफारस करावी असे ठरले. ***व्यवस्थापन मंडळ ठराव-*** वित्त समितीच्या ठरावानुसार केलेली शिफारस मान्य करण्यात आली. |
| | 174.3.3 | विद्यापीठातील शिक्षकेतर अधिकारी व कर्मचा-यांना सातवा वेतन लागु करण्याची बाब. ***वित्त समिती ठराव क्र.15.3.5*** *— महाराष्ट्र शासनाने* विद्यापीठाचा सातवा वेतन आयोगाचा शासननिर्णय निर्गमित केल्यानंतर विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचा-यांना सातवा वेतन आयोग लागु करण्याबाबत व्यवस्थापन मंडळाकडे शिफारस करावी असे ठरले. ***व्यवस्थापन मंडळ ठराव-*** वित्त समितीच्या ठरावानुसार केलेली शिफारस मान्य करण्यात आली. |
| | 174.3.4 | विद्यापीठातील कर्मचा-यांच्या कल्याणासाठी योजनेच्या वर्गणीच्या रकमेबाबत. ***वित्त समिती ठराव क्र.15.3.6*** — विद्यापीठातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी व कर्मचा-यांच्या वेतनातून कर्मचारी कल्याण निधीसाठी रु 60/- व रु. 30/-याप्रमाणे कपात केली जाते. सदरील योजना ही चांगल्या प्रकारची असल्यामुळे मा.कुलगुरु यांनी एका समितीचे गठण करुन दोन महिन्याच्या आत नियमावली तयार करुन तसा प्रस्ताव पुढील वित्त समिती मंजुरीस्तव सादर करावी असे ठरले ***व्यवस्थापन मंडळ ठराव-*** वित्त समितीच्या ठरावानुसार केलेली शिफारस मान्य करण्यात आली. |
| | 174.3.5 | विद्यापीठातील नियमित शिक्षकांसाठी करिअर अँडव्हान्समेट योजना राबविण्यासाठी — इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाने तयार केलेले परिनियम, फॉर्म इ. मंजुरीस्तव सादर ***व्यवस्थापन मंडळ ठराव-*** विद्यापीठातील नियमित शिक्षकांसाठी करिअर अँडव्हान्समेट योजना राबविण्यासाठी—इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाने तयार केलेले परिनियम, फॉर्म याच्या आधारे ज्या ठिकाणी अपेक्षित बदल आहे, ते बदल करुन तयार करावेत हे करतांना महाराष्ट्र शासनाने करिअर अँडव्हान्समेट योजना (CAS) निर्गमित केलेल्या शासन निर्णयाचा आधार घेऊन पुढील प्रक्रिया करावी यास मान्यता देण्यात आली. |
| 174. 4.0 | | मा.अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळचा विषय |
| | 174.4.1 | सन 2020 मधील कोविड -19 या विषाणूच्या प्रादुर्भावामुळे संपूर्ण जगाची आर्थिक परिस्थिती खालावलेली असल्यामुळे विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना सन 2020-21 या वर्षासाठी प्रवेश घेतांना प्रवेश शुल्क दोन हप्त्यामध्ये भरण्यास परवानगी देणेबाबत ***वित्त समिती ठराव क्र.15.3.7*** - सन 2020 मधील कोविड -19 विचार करता |

| | | |
|---|---|---|
| | | विद्यार्थ्यांना सन 2020-21या शैक्षणिक वर्षात प्रवेशासाठी दोन सुलभ हप्त्यामध्ये प्रवेश शुल्क भरण्यास परवानगी देण्याबाबत व्यवस्थापन मंडळाकडे शिफारस करावी असे ठरले.<br>***व्यवस्थापन मंडळ ठराव*** - वित्त समितीच्या शिफारशीनुसार विद्यार्थ्यांना सन 2020-21 या शैक्षणिक वर्षात प्रवेशासाठी दोन सुलभ हप्त्यामध्ये प्रवेश शुल्क भरण्यास परवानगी देण्यास मान्यता देण्यात आली. |
| | 174. 4.2 | 2 D Animation शिक्षणक्रमाच्या चौकशी अहवालाबाबत मा.कुलगुरु व श्री. एम.बी.पाटील, प्रभारी कुलसचिव यांनी उपस्थित सदस्यांना माहिती दिली याबाबत विद्यापीठाने याअगोदरच विद्यापीठाच्या विद्त परिषद बैठक क्र 49 व 50 अनुक्रमे दि. 8 ऑक्टोबर 2014 व दि. 29 जानेवारी 2015 रोजी याबाबत विषय सादर केल्याची माहिती दिली व 50 व्या विद्वत परिषदेच्या बैठकीत ठराव क्र. 49.4.37 नुसार व या चौकशी अहवालात दिलेले निष्कर्षानुसार विद्यापीठाने 2 D Animation अभ्यासक्रमाची अभ्यासकेंद्र ज्या संस्थेने दिली आहेत. (Red Pixel, Jalgaon) या संस्थेवर जळगाव येथे फिर्याद दाखल केली आहे. चौकशी समितीच्या अहवालामध्ये नमूद केल्याप्रमाणे Specific Responsibility कोणाची आहे याबाबत विद्यापीठांतर्गत संबंधीत अभ्यासक्रम देण्याबाबतच्या कार्यवाहीची चौकशी डॉ. डी. आर. नंदनवार, सहसंचालक, तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य यांनी करावी असे ठरले. परंतु डॉ. डी. आर. नंदनवार यांची बदली झाल्यामुळे, त्यांचा अहवाल विद्यापीठास अप्राप्त आहे असे मा. कुलगुरू यांनी सदस्यांना सांगीतले.<br>***व्यवस्थापन मंडळ ठराव*** - विद्यापीठांतर्गत संबंधीत अभ्यासक्रम देण्याबाबतच्या कार्यवाहीची चौकशी न झाल्यामुळे डॉ. अनिल कुलकर्णी व श्री. ज्ञानदेव नाठे यांची समिती नेमून लवकरात लवकर चौकशी करावी व त्याचा अहवाल व्यवस्थापन मंडळ बैठकीत सादर करावा यास मान्यता देण्यात आली. |
| | 174. 4.3 | जिल्हा भ्रष्टाचार निर्मुलन समितीकडे प्रलंबित असलेल्या विद्यापीठातील चार प्रकरणांचे अंतिम अहवाल प्राप्त न झाल्याबाबत मा. जिल्हाधिकारी, नाशिक यांनी विद्यापीठाचे कुलसचिव यांना दोन अर्धशासकीय पत्रे दिली आहेत याबाबत प्रभारी कुलसचिव श्री. एम बी पाटील यांनी उपस्थित व्यवस्थापन मंडळ सदस्यांना सांगीतले. याबाबत विद्यापीठाने कोणती कार्यवाही केली याबाबतची सखोल माहिती पुढीलप्रमाणे सादर केली. विद्यापीठाने दि. 17 डिसेंबर 2019 रोजी झालेल्या व्यवस्थापन मंडळाच्या ठरावानुसार डॉ. संजय खडक्कार यांच्या समितीने चार प्रकरणांबाबत अहवालात दिलेले मत विचारात घेऊन त्याआधारे योग्य ती कार्यवाही करीत असल्याबाबत जिल्हा भ्रष्टाचार समितीला कळवावे असे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार वरील चार प्रकरणाबाबत समितीचे निष्कर्ष सदस्य सचिव जिल्हा भ्रष्टाचार निर्मुलन समिती यांना विद्यापीठाचे जावक क्र.यचममुवि / कुका /02 /2020/015दि. 9 .1 2020 नुसार कळविलेले आहेत. तसेच मा.कुलसचिव यांनी जावक क्र. यचममुवि / आस्था /2020/242 दि. 16.6 2020 नुसार मा.जिल्हाधिकारी यांना पत्राद्वारे यासंदर्भात माहिती दिलेली आहे |

| | | |
|---|---|---|
| | | या अहवालातील जिल्हा भ्रष्टाचार समितीकडे असलेल्या 4 प्रकरणांबाबत तसेच दि. 17 डिसेंबर, 2019 च्या ठरावानुसार आर्थिक प्रकरणांची सखोल शहानिशा करणे आवश्यक आहे असे व्यवस्थापन मंडळ सदस्य डॉ. दिलिप म्हैसेकर व श्री. ज्ञानदेव नाठे यांनी सागीतले. त्यानुसार आर्थिक प्रकरणे डॉ. संजय खडक्कार, वित्त अधिकारी व परिक्षा नियंत्रक यांच्या समितीने एकत्रितपणे तपासावी व त्याचा सविस्तर अहवाल डॉ. अनिल कुलकर्णी यांच्या समितीकडे सादर करावा असे निर्देश दिले होते.<br>***व्यवस्थापन मंडळ ठराव*** - विद्यापीठातील वरील प्रलंबित चार प्रकरणांबाबत नेमका किंती रकमेचा गैरव्यवहार झाला आहे किंवा नाही याची शहानिशा करण्यासाठी नेमलेल्या समितीने त्यांचा अहवाल लवकरात लवकर डॉ. अनिल कुलकर्णी यांना सादर करावा व सदरचा अहवाल व्यवस्थापन मंडळापुढे ठेवावा यास मान्यता देण्यात आली. ठरावानुसार मा. जिल्हाधिकारी नाशिक यांना पत्र पाठविण्याचे निर्देश देण्यात आले. |
| | 174. 4.4 | विद्यापीठातील नियमित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-य़ासाठी मेडिक्लेम योजना त्वरीत तयार करण्यात येऊन ती पुढील व्यवस्थापन मंडळ बैठकीत सादर करावी असे निर्देश व्यवस्थापन मंडळ सदस्यांनी दिले व सदरील योजना तयार झाल्यानंतर त्याची माहिती इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, नवी दिल्ली यांना द्यावी असे व्यवस्थापन मंडळ सदस्य डॉ. सत्यकामा यांनी सुचविले. |

**सचिव**
**व्यवस्थापन मंडळ**

**अध्यक्ष**
**व्यवस्थापन मंडळ**